# विश्वासाने, मोशेने

धन्यवाद, भाऊ नेविल. सुप्रभात, बंधु–भगिनिनो. आज येथे आराधनालयात असणे हे चांगले आहे. आणि मला वाटले की कदाचित जर आज सकाळी भाऊ नेविल बोलले असते, तर मी रात्री बोललो असतो. आणि मग मी ह्या सकाळच्या सभेसाठी संडे स्कूलच्या धड्याकडे पहात होतो. आणि काय...जर प्रभूची इच्छा असेल, तर आपण हा—हा संडे स्कूलचा धडा घेण्याचा प्रयत्न करू.

2 आता, अंदाजे, आता दोन आठवडे झाले आहेत, जेव्हापासून मी यायला सुरुवात केली आहे. आणि जसे तुम्हाला ठाऊक आहे की मी खूप अस्वस्थ होतो, कार्यक्षेत्रावर, मी पूर्णतः, थकलेलो होतो आणि आणखी पुढे जाऊ शकत नव्हतो. आणि मग मला थोड्या विश्रांतीसाठी दूर यावे लागले. आणि मी केंटकी येथे, वूल्फ क्रिक धरणावर, माझा जन्म झालेल्या ठिकाणी सुमारे तीन दिवस घेतले. मला वाटते, "होय, मला आता खूप छान वाटत आहे. मी ठीक आहे."

3 आणि मी घरी परतलो आहे, आणि पहिली लहानशी गोष्ट माझ्यासमोर आली ती म्हणजे आयकरा संबंधी काही सरकारी कामकाज होते. मी पुन्हा सर्व प्रकारे त्याच्या मुळाशी गेलो. तेव्हा मला जाणीव झाली की त्यासाठी एक आठवड्यापेक्षा अधिक किंवा दोन आठवडे मला विश्रांती घ्यावी लागेल.

4 आणि आता माझ्या सेवकाईत बदल होणार होता. आणि माझ्याकडे कोणत्याही नियोजित सभा नव्हत्या. आणि हेच कारण आहे की मी एक प्रकारे स्वतःला बाजूला केले आहे, आणि विचार केला, आणि आता पुढच्या काही आठवड्यांत मी विश्रांती घेईन, संपूर्ण विश्रांती घेईन, आणि प्रभूवर अवलंबून राहीन.

5 आणि आपल्यातील बरेच लोक इथे आहेत, ते पूर्वी पासून आहेत, जे इतक्या दीर्घ काळापासून आमच्याबरोबर आहेत, त्यांच्या ध्यानात आहे की परमेश्वर आपल्याला काय म्हणाला आहे, त्याने सदैव ते पूर्ण केले आहे जे त्याने म्हटले आहे की तो करील.

6 मला आठवते, अगदी सुरूवातीस, इथल्या मंडळीत, त्या सकाळी जेव्हा आम्ही आराधनालयाचा दगड रचला होता, कसे त्याने ते...ते माझ्या बायबलच्या पानावर लिहिलेले आहे, आणि ते दगडात ठेवलेले आहे. त्या सकाळी, तो महान दृष्टान्त, त्यात म्हटले, "हे तुझे निवासमंडप नाही."

7 मी म्हणालो, "प्रभु, तर ते कोठे आहे?" त्याने मला खाली आकाशाखाली बसवले. आणि एक वाणी आली. आणि मी पाहिले आणि मला तीन वधस्तंभ दिसले, जसे की, ती झाडे आणि त्यांचे फळ, असेच काही. आपणास ठाऊक आहे की तो दृष्टान्त काय आहे. तो वर्षानुवर्षा करिता लिहिला गेलेला आहे.

8 दुसर्या दिवशी, तेथले एक जुने पुस्तक, उचलले, देवाने सांगितलेल्या काही गोष्टी वाचल्या; भाकीत केल्याप्रमाणे, ज्या आधीच पूर्ण झाल्या होत्या. त्या अल्पवयीन मुलांबद्दल, आणि युद्ध कसे घडून येईल याबद्दल, आणि त्या सर्व गोष्टी घडल्या आहेत.

9 त्या महान भविष्यवाण्यांपैकी, फक्त दोन गोष्टी शिल्लक आहेत. ती म्हणजे, अंड्यासारखी दिसणारी गाडी रिमोट कंट्रोलसह रस्त्यावर असेल, म्हणजे तुम्ही ती चालवत नाही. ती स्वतः नियंत्रण करते. आणि मग एक महान स्त्री उदयास येईल, कारण अमेरिका हे एक स्त्रीचे राष्ट्र आहे. आणि असे होईल...एक महान स्त्री उदयास येईल,

आणि देशामध्ये, राष्ट्राध्यक्ष होईल किंवा त्या सारखी असेल. आणि मग तेथे संपूर्ण विनाश होईल. संपूर्ण राष्ट्र नष्ट केले जाईल.

10 आणि, ते, मी भाकीत करतो...आता हे प्रभु परमेश्वर असे म्हणत आहे असे नाही. (दुसरे, स्त्रीविषयी, ते आहे, ते प्रभू परमेश्वर असे म्हणत आहे असे आहे.) पण मी 1933 मध्ये, भाकीत केले होते की, '77 च्या आधी जगाचा संपूर्ण नाश होईल.

11 म्हणून, मला हे तेव्हा माहित नव्हते की त्यांच्याकडे असे काहीतरी आहे जे पूर्ण विध्वंस करू शकते जसे आता त्यांच्याकडे आहे, पण मी त्या देशाचा संपूर्ण नाश पाहिला, फक्त झाडांच्या खोडाचे बुंधे आणि त्यासारख्या गोष्टी, उरल्या.

12 तर, ते त्याच्या मार्गावर आहे. आणि जर या इतर सर्व गोष्टी त्याने सांगितल्याप्रमाणे घडल्या, तर त्याही घडतील, हे अगदी येथे पवित्र शास्त्रात जसे सांगितले आहे तसेच आहे, तो काय म्हणतो, जर ख्रिस्त पहिल्या वेळी आला, तर तो दुसऱ्यांदा ही येईल. आणि त्याने सांगितलेल्या सर्व गोष्टी घडतील. आणि हे यथायोग्य पाहून, आणि जाणून की आम्ही आहोत...एक राष्ट्र म्हणून, आमचा क्रमांक लवकरच लागणार आहे, जाणतो की मंडळीचे स्वर्गरोहण होणार आहे. हे एका सेवकाचे, किंवा कोणत्याही सामान्य मनुष्याचे हृदय हलवित आहे, हे जाणून की आम्ही या दिवसात आणि वेळेत राहत आहोत. मंडळीसाठी, आतापर्यंत पृथ्वीवर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीपेक्षा हा सर्वात महान समय आहे; तो आता आहे. म्हणून, मी नक्कीच तुमच्या प्रार्थनेची अपेक्षा करतो.

13 आणि मग मी निवासमंडपात पाहिले, आणि मी पाहिले की त्यांच्याकडे...ते मंडळीत, मंडळासाठी आणि अशा गोष्टींसाठी, पुन्हा काही निवडणुका घेणार होते आणि सर्व काही होणार होते.

14 आणि—आणि मंडळीला एका लहान सभेची, थोडीशी प्रेरणेची गरज होती. आणि तू नेहमीच माझ्याशी दयाळूपणे वागलास, आणि मला आशीर्वाद दिलास. आणि मी येथे असल्यापासून, तुम्हाला आशीर्वाद मिळाला आहे असे वाटते. आणि मला खात्री आहे, की तुझ्याबरोबर राहणे, हे माझ्यासाठी आशीर्वाद ठरले आहे. आणि मी जे काही सांगितले ते सत्य म्हणून तुम्ही सदैव स्वीकारले आहे, कारण मी ते देवाकडून जाणले आहे. आणि मी—मी त्याचे कौतुक करतो.

15 मग, मी सुरूवात केली, आणि मग मला शोधून काढायचे होते, आणि आपली मंडळी, त्याचे मंडळ शक्तिमान करायचे होते, आणि नंतर निवडणुकीकरीता आणि इतर गोष्टी. आणि मग—मग, मी विचार केला, की यानंतर, मी पुन्हा कार्यक्षेत्रात जाण्यापूर्वी, बाहेर गेलो आणि थोडासा आराम केला.

16 ते तुमच्यामध्येच ठेवा. आता, ते बाहेरील लोकांसाठी नाही. ते ह्या आराधनालयासाठीच आहे. आम्हाला या आराधनालयाची सभा हवी आहे, जेणेकरून प्रत्येक गोष्ट, आणि प्रत्येक चूक, सर्व गोष्टी ज्या आजपर्यंत चालू आहेत, आणि कदाचित एकमेकांकडून थोड्याश्या भावना; त्या, मी त्यांच्यातील प्रत्येक घेणार आहे आणि त्यांना समोरासमोर आणणार आहे. म्हणूनच जर आपण यास तोंड देऊ इच्छित नसाल, तर आपण हा देश सोडावा हे चांगले आहे; कारण तुम्हाला त्या प्रत्येक गोष्टीला तोंड द्यावे लागणार आहे, जसे आपण येथे ह्या आराधनालयात करत असू. आणि सर्व काही सुरळीत केले पाहिजे, कारण आपण बंधू व भगिनी आहोत ज्यांनी भाकर मोडली आहे, ख्रिस्ताचे शरीर, आशीर्वादाच्या मेजावर. आणि काहीही नाही परंतु सैतान चूक होईल असे काहीही करेल, आणि भावना निर्माण करील, किंवा फाडून टाकील, किंवा त्या सारखे काही. आणि मी आपला भाऊ नेव्हिल ह्याला बरोबर घेणार आहे, आणि आम्ही ठिकठिकाणी जाणार

आहोत, आणि लोकांना एकत्रित, आणणार आहोत, जुने आराधनालय पूर्व स्थितीत येईपर्यंत, त्याच्या पायांवर पुन्हा स्थपित होईपर्यंत, यासाठी की देवाच्या राज्यात जावे. आता, मी हे बोलण्याचे हेच कारण आहे, कारण आज सकाळी हे आमच्या स्वतःच्या छोट्या समूहा समवेत आहे.

17 आणि आता मी थोडी विश्रांती घेणार आहे, आणि शक्य तितक्या लवकर परत येईन. मग मी पुन्हा कार्य क्षेत्रात उतरण्याची अपेक्षा करतो. आणि यावेळेस, प्रभूची इच्छा असल्यास, माझी इच्छा आहे की जी काही थोडी रक्कम गोळा केली आहे ती घ्यावी, आणि अशा प्रकारे, मी स्वत, बाहेर…हा परदेशी मिशन कार्यक्रम. आणि माझ्यासाठी एक नवीन तंबू आणि काही नवीन उपकरणे घ्यावी, आणि कार्य क्षेत्रात प्रारंभ करावा. चर्चमधून चर्चपर्यंत नव्हे, तर आपल्या स्वतःच्या सभांमध्ये जाण्यासाठी.

18 आता, ज्याने मला आमंत्रित केले आहे त्यांची उपेक्षा करीत नाही, ते चांगले आहे. परंतु त्यांतील बहुतेक, या अधिवेशनांमध्ये आपणास आढळते, त्यांचे म्हणणे असे की आपण तेथे असू, आणि मग आपले सर्व मित्र आत येतात, आणि नंतर तेथे पैशासाठी पुष्कळ मागणी केली जाते. ह्या लोकांकडून पैसे काढले जातात. आताच हे माझ्या लक्षात येऊ लागले आहे, आपण समजता. तर तेच आहे—ते बरोबर नाही. आम्हाला अशी जागा हवी आहे जेथे आम्ही त्यांना आणू शकतो. आपल्याला आपले पैसे आणण्याची गरज नाही. फक्त तुम्ही स्वत:, या, आणि—आणि परमेश्वराची सेवा करा. पहा? आणि म्हणून आता…

19 आणि माझ्या सेवकाईने आत्ताच वळण घेतले आहे. तुम्हाला आठवत असेल जेव्हा मी त्या व्यक्तीचा हात धरत असे, फक्त तेथे उभा राहात असे, आणि प्रभु मला सांगत असे की त्यांची समस्या काय आहे. म्हणत असे, "मग तसे घडत असे, म्हणजे लोकांच्या अंतःकरणातील गुप्त गोष्टी समजतात." आपल्यातील प्रत्येकाला हे माहित आहे की हे अगदी सांगितल्याप्रमाणे घडले आहे. आता ही पुढची पायरी आहे, ज्या विषयी भविष्यवाणी आणि भाकीत केले गेले आहे, जी त्यापेक्षा फार पलीकडे जाणार आहे, समजले. आणि ह्या समयी ती बदलत आहे.

20 आणि हेच कारण आहे की सैतान माझ्याशी आयकरासंबंधी झगडत आहे, मला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, मी सरकारला, सेवक म्हणून घेतलेल्या प्रत्येक पैशांवर, आयकर देणे लागतो, सत्तावीस वर्षांपासून, सेवकाईत प्रवेश केला तेव्हापासून. हे असे नाही, कारण ते इथल्या चर्चमधून गेले आहेत.

21 मी या मंडळीचा विश्वस्त आहे. ते अगदी बरोबर आहे. हे येथे रेकॉर्डवर आहे. तर, मग, जर मी या मंडळीचा विश्वस्त–कोषाध्यक्ष आहे, मग तेथे जगात असे काहीही नाही… सरकारला त्याच्याशी काहीएक कर्तव्य नाही. ते मंडळीला प्रश्न विचारत नाहीत. ते मला मंडळीचा कोषाध्यक्ष म्हणून प्रश्न विचारत आहेत. आणि विश्वस्तांनी एका कागदावर स्वाक्षरी केली आहे जे बँकेकडे आहे, ही सर्व माझी रक्कम…माझी स्वतःची संस्था असण्याऐवजी, मी ते माझ्या मंडळीमधून पुढे केले आहे, कारण तीही, एक प्रकारे, एक स्वयंचलित संस्था आहे.

22 आणि तसे करण्यासाठी, मंडळीपासून पळ काढणे आणि ते सोडून देणे ह्यात मला मदत करते, आणि त्यांतून बाहेर पडणे आणि येथे मी कोणीच नसणे. मी लोकांना वचन दिले आहे की मी, वेळोवेळी, चर्चला परत येईन, आणि त्यांना मदत करीन. म्हणूनच मी हे असेच ठेवले आहे, कारण मी तुम्हाला एक वचन दिले आहे. म्हणूनच मी एखादा व्यक्ती ठेवण्याऐवजी, तशा प्रकारे मी राहिलो आहे. मग, जर तुम्ही तसे करता, ते त्यास

संस्थेत गणते. आणि मी ठामपणे संघटनेच्या विरोधात आहे. तर मी—मी हे जसे आहे तसे, देवाच्या हातात ठेवतो, जेणेकरून आपण देवाच्या राज्यासाठी पुढे जाऊ शकू.

23 आता, आज सकाळी आपल्याला या धन्य प्राचीन वचनाचा अभ्यास करायचा आहे, आणि विश्वास करायचा आहे.

24 आता, मला हे देखील म्हणायचे आहे…मी बंधू इगन आणि इतर, काही विश्वस्त जे येथे बसलेले आहेत त्यांना पाहिले, दुसर्या रात्री, आमची विश्वस्त बैठक झाल्यानंतर; हे खरे आहे, की मी मंडळीपुढे जाहीरपणे सांगतो की, तुमच्यातील प्रत्येकजण आता ह्यापुढे एक—एक नियुक्त विश्वस्त असणार नाही. तुम्ही निवडलेले विश्वस्त आहात आणि तुमचे नाव पुस्तकांवर आहे. ठीक आहे.

25 आणि आता ते आणखी काही डीकन्सच्या—च्या निवडणुका घेणार आहेत, आणि इतर काही. आणि बंधू नेव्हिल, हे या सभेनंतर लगेच त्यांना बोलवतील, ठीक आहे, आणि कोषाध्यक्ष वगैरे साठी, कारण आपण चर्चची स्थापना केली आहे. सर्व पार्श्वभूमी, समजून घ्या, तयार व्हा, त्यानंतर आपल्याकडे संजीवन येऊ शकेल.

26 आता, आपण येथे पानांकडे वळण्यापूर्वी, आपल्या रविवार शाळेच्या धड्यासाठी, जिवंत देवाच्या या महान वचनाकडे, या पुस्तकाच्या लेखकाशी बोलत असताना, आपण काही क्षण आपली मस्तके झुकवूया. आणि आता प्रत्येक विचार, विरुद्ध असलेली प्रत्येक गोष्ट बाजूला ठेवूया, जी आपल्याला आशीर्वाद प्राप्त करण्या पासून दूर ठेवते.

चला प्रार्थना करूया.

27 परम पवित्र आणि नीतिमान देवा, आम्ही आता तुझ्या धन्य भव्य उपस्थितीत आलो आहोत, तुला आमचे जीवन, आणि आमचे—आमचे जीव, आणि आमचे शरीर, आमच्या सेवा, आणि आमचे कलागुण अर्पण करीत आहोत. आणि आमच्याकडे असलेले सर्व, आम्ही ते तुझ्यापुढे सादर करीत आहोत. आणि तु आमच्याकडे पाहात असता, प्रभु, जर तेथे कुठले उघड आणि कबूल न केलेले असे काही पाप असेल, आम्ही तुला सांगत आहोत, हे प्रभू परमेश्वरा, की तू अशा ठिकाणी, आपला पुत्र, येशूचे, रक्त लाव. कारण, आम्ही हे जाणतो की आम्ही स्वतः मध्ये अपूर्ण आहोत, आणि स्वतःला टिकऊन ठेवणे हे आमच्यासाठी अशक्य आहे. परंतु आम्ही त्याच्या अनमोल रक्तावर, आणि त्याच्या कृपेवर पूर्णपणे अवलंबून आहोत ह्यासाठी की त्याने ते आमच्या हिशोबी लावावे, यासाठी की आम्ही अयोग्य पापी एक दिवस धाडसाने तूझ्या उपस्थितीत यावे, हे प्रभु येशूचे रक्त आमच्यापुढे आणावे. जे, तू, भूतकाळात, ते आपल्या एकमेव पुत्राचे रक्त म्हणून ओळखले होतेस, आणि असे अभिवचन दिले आहेस की, "जर आम्ही आपल्या पापांची कबुली दिली, तर त्याच्या कृपेने आम्ही नीतिमान ठरविले जाऊ."

28 आणि प्रभु, आता आम्ही तुला अशी विनंति करतो की तू आम्हास अशा चुकांची, उल्लंघन किंवा दुर्लक्षित पापांची क्षमा करशील, मर्यादेचे उल्लंघन, की जर एखाद्या वाईट विचाराने, सैतानाच्या अग्निमय गोष्टींद्वारे, आमच्या आत्म्यास दुभंगले असेल तर, तर तू तुझ्या आणि तूझ्या लोकांच्या, ह्या दुष्ट शत्रूला पळवून लाव.

29 आणि आम्ही अशी विनंती करतो की तु यावेळी वचन धारण करण्यासाठी पवित्र आत्मा पाठवावा, जसे आम्ही स्वत:ला साधन म्हणून देतो, की तु आमच्याद्वारे बोलशील, आणि आमच्याद्वारे तुझे शब्द, ऐकशील. आणि आम्ही परत तूझ्या कडून ते प्राप्त करू, आणि आज, हे स्थान सोडताना, आम्हाला असे वाटेल की आम्ही ख्रिस्ताच्या कार्यासाठी पुन्हा जुळविले गेले आहोत; पवित्र आत्म्याच्या भेटीमुळे, आम्ही आज रात्री आणि उद्याच्या सेवेसाठी अधिक लायक होऊ शकतो.

30 सर्वत्र आमच्या बंधूंना, जगभरातील मंडळींना आशीर्वाद दे, जे या वाईट दिवसात जीवनाचा संदेश धरुन आहेत. आम्हाला असे वाटते की काम करण्यासाठी बराच वेळ शिल्लक राहिला नाही, कारण रात्र लवकर येत आहे. युद्धाचे ढग पुन्हा पसरत आहेत. वाईट दिवस जवळ आहेत, आणि आम्ही प्रार्थना करतो की तु आम्हाला यापूर्वी कधीही केले नव्हते असे काम करू दे. परमेश्वरा, आमच्या थकलेल्या शरीराला विश्रांती दे, आणि आम्हाला युध्दात परत पाठव. कारण आम्ही हे प्रभु येशूच्या नावाने मागतो, आणि आम्ही त्याच्याद्वारे प्रार्थना करतो. आमेन.

31 ह्या सकाळी, आपण बायबलच्या, इब्री लोकांस पुस्तकाचा—चा 11वा अध्याय उघडूया.

32 बुधवारी रात्री आपण इब्री लोकांस पुस्तकाच्या 7व्या अध्यायावर बोलत होतो, "मलकीसदेक, वडील व आई नसलेला, जन्मदिवस, किंवा जीवनाचा अंत नसलेला."

33 आणि मला वाटते की, कदाचित, ह्या सकाळी, हे अद्भुत पुस्तक पुन्हा उघडणे योग्य ठरेल, आधीच्या वाचनामध्ये, आम्हाला जे म्हणायचे होते त्याची पार्श्वभूमी आपल्याकडे आहे. आणि 10वा आणि 9वा अध्याय वगळून, जे यज्ञविषयक नियम आहेत, आपण "विश्वासा" च्या ठिकाणी येऊ. आणि येथे इब्री लोकांच्या पुस्तकात, 11वा अध्याय, आणि 23व्या वचनापासून सुरुवात करु, आपण हे असे वाचतो:

> *जेव्हा मोशेचा जन्म झाला तेव्हा त्याच्या आईवडिलांनी विश्वासाने त्याला तीन महिने लपवून ठेविले, कारण ते मूल सुंदर आहे असे त्यांनी पाहिले. आणि त्यांना राजाच्या आज्ञेचे भय वाटले नाही.*
>
> *मोशे प्रौढ* झाल्यावर *त्याने आपणास फारोच्या कन्येचा पुत्र म्हणविण्याचे विश्वासाने नाकारले;*
>
> *पापाचे क्षणिक सुख भोगणे ह्यापेक्षा, देवाच्या लोकांबरोबर दुख सोसणे हे त्याने पसंत करून घेतले;*
>
> *ख्रिस्ताप्रीत्यर्थ विटंबना सोसणे ही मिसर देशातील धनसंपत्तीपेक्षा अधिक मोठी संपत्ती आहे असे त्याने गणले:...कारण त्याची दृष्टी प्रतिफळावर होती.*
>
> *त्याने राजाच्या क्रोधाला न भिता, विश्वासाने मिसर देश सोडला: कारण जो अदृश्य आहे, त्याला पाहत असल्या सारखा त्याने धीर धरला.*

34 मला आज सकाळी "विश्वासाने निवडावे," हा विषय घ्यायचा आहे. आणि मला मजकूर घ्यायचा आहे, 23व्या अध्यायातील पहिले तीन शब्द, *विश्वासाने, मोशेने*. आणि, "विश्वासाने निवडणे," आपण ज्या बहुतेक गोष्टी करतो, आपण विश्वासाने निवड केली पाहिजे. आणि आपल्याला आढळले की ज्या सर्व गोष्टी मोशेने केल्या, ज्यांची पुनरावृत्ती करण्यासारख्या आहेत, त्या विश्वासाने होत्या; पाहण्याद्वारे नव्हे, परंतु विश्वासाद्वारे.

35 आणि हेच कारण आहे की मी ह्या सकाळी, ह्या स्थितीतील मंडळीसाठी हा विषय निवडला आहे, जे आमच्या...अगदी आपल्या शाळांमध्ये, आणि आजूबाजूला, आपल्याला इतके वैज्ञानिक शिक्षण मिळाले आहे. यामुळे, आम्ही लोकांना विश्वासापासून दूर नेले आहे. आता, विश्वास विज्ञानाने सिद्ध केला जात नाही. विश्वास असा आहे ज्यास विज्ञान पाहत नाही. आणि आपण...जर आपण हा महान विश्वास कधी गमावतो, तर आपण पूर्णपणे अंधारात आहोत, हे...आपण कितीही शिक्षित असलो तरीही, आपण विश्वास ठेवण्याच्या आपल्या स्वतःच्या पद्धतीनुसार, आपण देवाचे वचन कसे स्पष्ट करू शकतो.

36 देवाला संतुष्ट करण्याचा तेथे कोणताच मार्ग नाही, केवळ विश्वासाद्वारे. पवित्र शास्त्र असे स्पष्टपणे सांगते, आणि ते विश्वासाने होते. पवित्र शास्त्र म्हणते, "आणि विश्वासाशिवाय देवाला संतुष्ट करणे अशक्य आहे."

37 म्हणून, जर विश्वास विज्ञानाशी असहमत असेल, आणि विज्ञान विश्वासाशी असहमत असेल, तर ते परस्परांना अगदी काठावर—वर उभे करते, तर मग आपण निवड केली पाहिजे जशी मोशेने केली. विश्वासाने आम्ही विश्वास ठेवतो!

38 आता, जर आपण विश्वास गमावला, तर आपल्याला देवाकडून कधीही प्रार्थनेचे उत्तर मिळणार नाही. "कारण देवाकडे येणाऱ्याने प्रथम असा विश्वास केला पाहिजे की तो आहे, आणि जे त्याचा शोध घेतात त्यांना प्रतिफळ देणारा आहे." म्हणून, जर आपण विश्वास गमावला, तर आपल्या प्रार्थना रद्द केल्या जातात; आपल्याला काहीही मिळत नाही.

39 म्हणून आज सकाळी, आपण हाच विचार करू शकतो की विश्वास पकडून ठेवा. मग, जर आपण विश्वास गमावला, तर आपल्या सर्व आशा संपल्या आहेत. आणि जर आपण विश्वास गमावला तर आपली सर्व आध्यात्मिक वास्तविकता नाहीशी झाली आहे. कारण, तुम्ही दिसणाऱ्या गोष्टींवर तुमचा विश्वास ठेवू शकत नाही, कारण ज्या गोष्टी तुम्ही पाहता त्या सर्व नाशवंत आहेत.

40 जर आपण एखादा महान व्यक्ती, एखादा महान सेवक किंवा एखादी मोठी मंडळी याकडे पाहतो, तर ते सर्व एक दिवस, नाश पावतील. आणि जर आपण एखाद्या महान राष्ट्राकडे, किंवा महान शस्त्राकडे पाहतो, तर ते सर्व एक दिवस नाश पावतील. आणि तर मग आपण विश्वासाने जगले पाहिजे, ज्या गोष्टी विज्ञान घोषित करीत नाहीत. आपण विश्वासाने विश्वास ठेवतो.

41 आता, जर आपण विश्वास गमावला तर आपण आपले गौरव गमावतो. आता, जर आपण विश्वासापासून दूर गेलो, तर आपण मंडळीला बौद्धिक क्षेत्रात घेऊन जातो.

42 आणि बर्याच वेळा, लोकांमध्ये, असा विचार केला जातो, की ती एक मोठी मंडळी होती म्हणून, आणि त्यांच्याकडे महान मंडळ्या, महान मनोरे, आणि पुष्कळ उत्तम पोषाक घातलेले, आणि सभ्य लोक, आणि पुष्कळ अर्थसहाय्य, की त्यांना अशा गोष्टी परवडतील, आम्ही, बर्याचदा, विचार केला की ते प्रेरणादायक होते, हे विशिष्ट चर्च प्रेरणादायक असले पाहिजे. किंवा, आपल्याला बर्याचदा वेगवेगळ्या सेवकांचा संदर्भ दिला जातो जे कार्यक्षेत्रात असतात आणि ज्यांच्याकडे मोठ्या गर्दीच्या सभा असतात, आणि कधीकधी, आम्हाला वाटते, की ते प्रेरणेची चिन्हे आहेत. पण हे पूर्णपणे सत्य नाही. ती मानवी प्रेरणा आहे.

43 पण खरी प्रेरणा ईश्वराची इच्छा पूर्ण केल्याने येते. पहा? मग ते एक असो, किंवा फक्त मूठभर. मग ती मोठी मंडळी असो, किंवा एक छोटी मंडळी असो, काही फरक पडत नाही. तो एक महान, बोलणारा वक्ता असो, किंवा फक्त एक माणूस ज्याला त्याच्या बाराखडीचे क्वचितच ज्ञान असेल, त्याने काही फरक पडत नाही. हे त्याने आणलेल्या संदेशावर अवलंबून आहे, की ते देवाच्या वचनाने प्रेरित आहे की नाही, किंवा, हे मानवी प्रेरणेच्या बौद्धिक संकल्पनेतून प्रेरित आहे?

44 काही लोक प्रभावी वक्तव्यामुळे प्रेरित होऊ शकतात. हे ते योग्य ठरवत नाही. कधीकधी ते उत्तेजित होतात कारण तो माणूस इतका प्रशिक्षित असतो की तो आपला मुद्दा पुढे करू शकतो. याचा अर्थ असा नाही की तो देवाचा आहे. समजले?

45 हे केवळ देवाच्या चिरंतन, शाश्वत आशीर्वादित वचनाद्वारेच, आपल्याला प्रेरणा मिळू शकते, आणि ती पवित्र आत्म्याद्वारे दिली जाते. विश्वासाने आम्ही ती प्राप्त करतो.

46 आता आपण मोशे, आणि त्याच्या आयुष्याचा हा महान काळ याविषयी विचार करू. आणि आपण मागे, त्याचा जन्म आणि देव त्याची काळजी कशी घेतो याबद्दल वाचले, परंतु मोशेच्या जीवनात एक अशी वेळ आली जेथे त्याची एक निवड करण्याची वेळ होती. जर आपण बरोबर वाचले, तर आपल्याला कळते की तो फारोच्या कन्येचा पुत्र होता, आणि सिंहासनाचा वारस होता, आणि मिसरा मधील पुढील फारो झाला असता. म्हणून जेव्हा तो वयात आला, आणि प्रौढ झाला, तो सभोवताली पाही तेव्हा त्याच्या लक्षात येई, आणि तेथे ते गुलाम चिखलाच्या खड्ड्यात काम करीत असत. आणि, जसे तो फारो राजवाडयाच्या खिडक्यांमधून गुलामांवर पाहत असे, त्याच गुलामांना मोशे पाहत असे, पण तेथे पाहण्यात खूप फरक होता.

47 आज सकाळी, काही मिनिटांसाठी, मी ह्याच विचाराच्या आधारावर सुरुवात करू इच्छितो, आणि स्वर्गातील देव येथील प्रत्येक हृदयास त्याच्या घरी आणो. आपण एखाद्या गोष्टीकडे कसे पाहतो, त्यानेच तर फरक पडतो.

48 एक महान सुवार्तिक, जॉन स्प्राउल, जो बंधू बॉसवर्थच्या सेवकाईद्वारे बदलला होता, तुमच्यापैकी बऱ्याच जणाना ओल्ड ग्लोरी बार्न आठवत असेल. तो म्हणाला, आपली प्रिय जोडीदार आणि पत्नी हिच्या मृत्यूपूर्वी, एके दिवशी तो सहलीला जात होता. ते फ्रान्समधील ला सॅले, लॉरेन, येथे होते. आणि मला त्या ठिकाणी भेट देण्याचे भाग्य मिळाले. आणि मार्गदर्शक त्यांना बागेतून बाहेर घेऊन जात होता, आणि त्यांना वेगवेगळ्या गोष्टी दाखवित होता. ते वधस्तंभावर खिळलेल्या प्रभु येशूच्या एका विशिष्ट पुतळ्याजवळ आले. आणि श्री. स्प्राउल ते पहात उभे होते, तो आणि त्याची पत्नी, आणि, त्यांच्या अंत:करणात, ह्या कलाकाराच्या किंवा मूर्तिकाराच्या मनात काय असेल याविषयी टीका करीत होते, जे त्याने दगडात कोरले होते, प्रभु येशूच्या प्रेमाचे आणि दयेचे प्रतिनिधित्व करणारी ही एक भयानक दिसणारी गोष्ट होती, आणि हे सर्व कसे ओबडधोबड आणि ठेचले गेलेले दिसत होते. आणि तो मार्गदर्शक श्री स्प्राउलकडे आला, आणि तो म्हणाला, "श्रीमान, मला असे वाटते की आपण प्रभु येशूच्या या पुतळ्याची टीका करीत आहात."

आणि तो म्हणाला, "मी करीत आहे."

49 आणि तो म्हणाला, "मला हयात बिलकुल आश्चर्य वाटत नाही, कारण बहुतेक लोक जेव्हा त्याकडे पाहतात, प्रथम, त्यावर ते टीका करतात."

50 आणि श्री. स्प्राउल म्हणाले, "का, मला अशा गोष्टीकडे पाहून कुठली दया किंवा प्रेरणा दिसत नाही, म्हणून मी विचार करीत आहे की शिल्पकाराने हे असे का केले?"

51 "आणि शिल्पकार..." म्हणाला, "मि. स्प्राउल, हा पुतळा ठीक आहे, आणि शिल्पकाराच्या मनात योग्य गोष्ट होती. परंतु समस्या कोठे आहे, ती तुमच्याबरोबर आहे. आपण जसे त्याच्याकडे पाहता तसा तो आहे." आणि मग त्याने त्याचा व त्याच्या बायकोचा हात धरला, आणि त्यांना त्या वधस्तंभाच्या पायाजवळ वेदीपाशी नेले. आणि तो म्हणाला, "आता, श्री. स्प्राउल, आता वर पाहा." आणि जेव्हा त्याने वर पाहिले, तेव्हा तो म्हणाला की जणूकाही त्याचे हृदय बंद पडले. त्यात किती फरक होता, तिथे उभे राहणे आणि त्याकडे *त्या* दिशेने पाहणे, आणि खाली उतरावे आणि त्या दिशेने पहावे ज्या प्रकारे पाहण्यासाठी तो तयार केला गेला होता.

52 आणि देव हा तशाच प्रकारे आहे. विश्वासही तशाच प्रकारे आहे. आपण त्याकडे ज्या प्रकारे पाहतो तसा तो आहे. जर आपण त्याकडे एक प्रकारचे ऐतिहासिक बायबल म्हणून

पाहिले, जे मागील काळात घडून गेले आहे, आपल्याला बायबलचे खरे मूल्य कधीही कळणार नाही. आपण आपल्या गुडघ्यावर गेलो पाहिजे, आणि ह्या बायबलच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत, आणि पवित्र आत्म्याच्या नजरेने त्याकडे पाहिले पाहिजे.

53 मी आज सकाळी, या प्रेक्षकांना विचारेन. जर तो ऐतहासिक देव सारखाच देव नसेल तर तो आज आपल्यासाठी काय चांगले काम करील? देव काय चांगले करतो, जो मोशेला घेऊन जातो व त्याच्या सह चमत्कार करतो जे त्याने केले होते. जर तो तोच देव नसेल अशा देवाचे वाचन केल्याने आपले काय भले होणार? तो कसा चांगला देव आहे जर तो आजही सारखाच देव नाही, ज्याने त्या अग्नीच्या भट्टीतून इब्री मुलांची सुटका केली? तो कसा चांगला देव आहे, ज्याने गत दिवसांत, चांगले आणि वाईट यांच्यामध्ये निवाडा केला, आणि जर वाईटाला शिक्षा आणि नीतिमानाला आशीर्वाद दिला, जर तो आजही सारखाच देव नसेल? आपण चर्चला कशासाठी जातो? जर तो न्याय करणारा तोच देव नाही, तर आपण कशाला जगाच्या गोष्टींपासून वेगळे होतो, आणि तेच मत जे तो सदैव होता? ते देवासाठी कसे चांगले असेल जो देव उग्र ताप आलेल्या स्त्रीला आपल्या हाताने स्पर्श करू शकतो, आणि ताप निघून जातो, जर तो आज तोच देव नाही तर? मरणानंतर चार दिवसांनी, आपल्या मित्राला थडग्यामधून उठविणाऱ्या देवाची सेवा करणे कसे चांगले असेल, जर तो आज तोच देव नाही तर?

54 विश्वासाने आपण असा विश्वास ठेवतो की एका गौरवी दिवशी तो आपल्याला पृथ्वीवरुन बोलविल, जरी आपण एक चमचाभर राख असलो तरी. आपण ते कसे सिद्ध करतो? आपण ते सिद्ध करत नाही. आपण यावर विश्वास ठेवतो. आपल्याला काहीही सिद्ध करण्यास सांगितले नाही. आपल्याला यावर विश्वास ठेवण्यास सांगितले आहे.

55 विश्वासाने मोशेने *अमुक–अमुक* केले. आणि जसे मोशेने, एक तरुण असता, राजवाड्याच्या खिडकीतून, त्या गुलामांकडे पाहिले, त्याने तोच गलिच्छ, घाणेरडा, घाणीने माखलेल्या गुलामांचा समूह पाहिला जो फारोने पाहिला.

56 आणि जेव्हा फारोने व मिसऱ्यानी, त्यांच्याकडे पाहिले, तेव्हा ते गुलामांच्या समुहाशिवाय दुसरे काहीच नव्हते. ते सर्व त्यांच्यासाठी चांगले होते; केवळ मानवी चिखल मळणारे कामगार म्हणून, फारो ज्या शहरांचे बांधकाम करीत होता त्या शहराच्या उपयोगासाठी चिखलाच्या विटा बनवित होते. अशा प्रकारे मिसरी लोकं व फारो गुलामांकडे पाहत होते.

57 परंतु मोशे, जेव्हा तो त्यांच्याकडे पाही, तेव्हा मोशेचे पाहणे वेगळे होते. जेव्हा तो, खिडकीजवळून जाताना, त्यांच्या चेहऱ्यावरील मोठे खड्डे, त्यांच्या गालावर ओघळणारे अश्रू पाही, आणि त्यांची वाकलेली शरीरे, तो त्यांच्याकडे देवाचे लोक म्हणून पाही. त्याने त्यांच्याकडे गुलामांसारखे पाहिले नाही. त्याने त्यांच्याकडे देवाचे निवडलेले लोक म्हणून पाहिले.

58 आणि, ओह, जसे मी, एका देशातून दुसऱ्या देशात, आणि एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात, प्रचारासाठी जातो! जेव्हा पासून मी या छोट्या मंडपाचे दरवाजे सोडले आहेत, ती एक आंतर–सांप्रदायिक संस्था आहे, जेथे नियम नाहीत परंतु प्रेम, कोणतेही पुस्तक नाही परंतु बायबल, आणि कोणताही पंथ नाही परंतु ख्रिस्त, मी देवाच्या मुलांकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे, आणि नाकारलेल्यांवर, देवाचे निवडलेले आणि नियुक्त लोक म्हणून. मी त्यांना ब्रॅन्हम आराधनालयाशी सलघ्न आहात की नाही ते विचारत नाही. मी त्यांना विचारत नाही की ते मेथडिस्ट आहेत, किंवा ते प्रेस्बिटेरियन आहेत, किंवा जर ते पेन्टेकोस्टल, किंवा नाझरिन्स, किंवा पिलग्रीम होलीनेस आहेत. मला फक्त

त्यांच्यावर देवाचे लोक म्हणून पहायचे आहे. आणि त्यांची कृत्ये आणि त्यांच्या कृती पाहत आहे, की ते प्रभू परमेश्वराचे सेवक आहेत. आणि माझे अंतकरण त्यांच्याशी सहभागीता करण्याची इच्छा करते, मग ते कोणते ही नांव धारण केलेले का नसोत. मी केवळ त्यांच्या सहभागीतेची इच्छा करतो. मी त्यांच्यावर प्रेम करतो कारण मला माहित आहे की ते देवाचे लोक आहेत.

59 जेव्हा मी एखादी स्त्री लांब स्कर्ट घातलेली, आणि जिचे केस मागे व्यवस्थित विंचरलेले, रस्त्यावर खाली येताना पाहतो, आणि—आणि एक सभ्य दिसणारा पोषाख घातलेली; आणि मी आणखी एक तरूण स्त्री पाहतो, कदाचित त्याच वयाची, लहानशी विजार घातलेली; ती कदाचित, दिसण्यात, जगाच्या दृष्टीने, त्या लांब केस असलेल्या स्त्रीपेक्षा दुप्पट सुंदर असेल, परंतु मी ख्रिस्ती लोकांप्रमाणे कपडे घातलेल्या त्या मुलीची बाजू घेईन. जरी ते तिच्याकडे पाहून हसत असतील, आणि तिला धर्मवेडी म्हणतील, तरीही, मी माझी बाजू घेईन. ती कदाचित दुसर्या मुलीसारखी सुंदर नसेल, स्वाभाविकरित्या, परंतु ती काहीतरी पाहते. विश्वासाने ती त्याला पाहते जो अदृश्य आहे, जो तिच्या जीवनाला मार्ग दाखवित आहे.

60 जेव्हा मी एखाद्या मनुष्याला काम करताना पाहतो, ज्याला "डिकन," किंवा "प्रचारक," किंवा "धर्मवेडा," म्हटले जाते, कारण तो धूम्रपान, आणि बिअर मद्यपान करण्यास नकार देतो, आणि नृत्य करण्यासही नकार देतो, जसे त्यांच्यातील इतर करतात, आणि त्याला "एक धर्मवेडा," म्हणतात, माझे हृदय त्याच्यासाठी तुटते. तो माझा भाऊ आहे, जो खाली या मिसराच्या भूमीमध्ये आहे, ज्यामुळे आपले अंत:करण त्याला मिठीत घेण्याची इच्छा करते आणि म्हणते, "भाऊ, आपण या देशात, प्रवासी आणि परके आहोत, आणि मला तुमच्याबरोबर सहभागीता करण्याची इच्छा आहे."

मोशेला निवड करावी लागली, विश्वासादवारे निवड.

61 फारोच्या मुलीचा पुत्र होण्याच्या संधीवर किती तरुण पुरुष तयार झाले असतील! मोशेला मिळालेल्या संधीवर, किती तरुण पुरुषांनी उडया मारल्या असतील, जगातील सर्व आनंद आणि आकर्षणाचा आनंद उपभोगण्यासाठी, मिसराचा राजा बनण्यासाठी, सर्व जग त्याच्या पायाशी आणण्यासाठी! "किती मूर्ख गोष्ट आहे," त्याच्या काळातील तरुणांनी विचार केला असेल, "जेव्हा मोशेने देवाच्या पीडित व दुखी लोकांसोबत आपले स्थान निवडले."

62 त्याने हे का केले? विश्वासाने, जेव्हा त्याने आपली दृष्टी वर केली, तेव्हा त्याने या जगाच्या अत्यंत आकर्षक सौंदर्या पलीकडे पाहिले. त्याने पापाच्या सुखांच्या पलीकडे पाहिले. आणि बायबल म्हणते की विश्वासाने, जो अदृश्य आहे त्याला पाहत असल्यासारखा त्याने धीर धरला, आणि त्याने परिणामाची पर्वा न करता देवाची सेवा करण्याचा निर्णय घेतला.

63 हयात बदल झालेला नाही. आपल्यातील बरेच जण ज्याला आपण चांगली इमारत म्हणतो त्याकडे जाऊ शकतात. आपण, कदाचित, सहभागीता आणि चांगल्या ठिकाणी बसण्याचा आनंद घेऊ शकतो. आपण कदाचित, मद्यपान, धूम्रपान, आणि कपडे घालणे आणि जगासारखे वागणे यासाठी अधिक लोकप्रिय असू शकतो. पण काय महत्वाचे आहे? आपण आपली दृष्टी वर लावली आहे आणि विश्वासाने आपण जो अदृश्य आहे त्याला पाहता, आणि ह्या दिवसातील नाकारलेल्या आणि तथाकथित देव-वेड्या लोकांबरोबर तुम्ही उभे राहिला आहात. कारण विश्वासाने आपण जो अदृश्य आहे त्याला पाहतो, छळ व दू:ख सहन करण्याचे निवडतो.

64 मी लोकांना असे म्हणणार नाही की त्यांनी पीडित होण्यासाठी निवड केली पाहिजे. मी असे म्हणत नाही की आपण दु:ख निवडले पाहिजे. असे करणे मानवी गोष्ट नाही. परंतु जर दु:ख कर्तव्याच्या मार्गावर असेल, तर ते येताच आपण घेऊया. माझी इच्छा नाही की तुम्ही काहीतरी कोणासाठी करावे की कोणी तुमची मस्करी करावी. माझी इच्छा नाही की आपण वेगळ्या गोष्टी बोलाव्या, की, "मी एक आहे...मी अशा चर्चशी संबंधित आहे जे जगातील, *अमुक–अमुक* गोष्टीत विश्वास ठेवत नाही," आणि यासारख्या गोष्टी, फक्त लोकांना तुमची मजा करू देण्यासाठी. आपण ते स्वतःवर आणत आहात. मी तुम्हाला असे मी म्हणणार नाही की आपण येथे बाहेर जावे आणि विक्षिप्त असे काहीतरी करावे. मला असे वाटत नाही की आपण तसे करावे, जेणेकरुन कोणी म्हणेल की आपण धर्मवेडे आहात. तूम्ही ते स्वतःवर ओढून घेत आहात. परंतु जर ते देवाच्या प्रती असलेल्या तुमच्या कर्तव्याच्या मार्गात असेल, तर जगाला काय म्हणायचे आहे ते म्हणू द्या. तुम्ही जगत राहा.

तुम्ही निवड करा. प्रत्येक पुरुष आणि स्त्रीला ही करावी लागते.

65 मोशेने जे पाहिले ते फारोने पाहिले असते तर काय झाले असते? त्याने लोकांचे हाल पाहिले. काय किंमत द्यावी लागणार हे त्याला माहित होते. परंतु पापाचे सुख भोगण्याऐवजी, त्याने विश्वासानेच ते निवडले.

66 येथे कदाचित लहान, तरुण स्त्रिया, आकर्षक तरूण स्त्रिया बसल्या असतील. जग आपणास सांगण्याची इच्छा करील, "*असे–आणि–असे* करा. तू सुंदर आहेस. आपले शरीर खूपच सुंदर आकाराचे आहे. तुम्ही ते दाखवायला हवे."

67 पण, माझ्या बहिणी, आपले डोळे वर करुन त्यापलीकडे पाहा, त्याच्याकडे पाहा ज्याने म्हटले आहे की, "स्त्रीने पुरुषाचे वस्त्र घालणे हे घृणास्पद आहे."

68 जर आपल्या समाजाच्या लोकांमधील पुरुष, जर त्या स्त्रिया ज्यांच्या सोबत आपला संबंध आहे, त्यांनी म्हटले, "ते लांब केस कापा. ते थंड वाटेल. हे, *असे, तसे,* किंवा *इतर* असेल." किंवा, "ते आपल्यासाठी अधिक चांगले होईल." तुम्ही ते ऐकू नका!

69 तुम्ही तुमचे डोळे वर लावा, आणि विश्वासाने त्याला पाहा ज्याने म्हटले आहे की, "स्त्रीचे केस तिचे गौरव आहे, आणि तिने ते कापू नयेत."

70 जर ते म्हणतात, "ते लोकप्रिय होईल. जर आपण संगतीप्रिय मद्यपेय घेतले, तर आपली नोकरीच्या ठिकाणी चांगली प्रगती होईल, किंवा तुमच्या मालकाशी चांगले संबंध होतील, जर तुम्ही बाकीच्या स्त्रियांप्रमाणे सिगारेट ओढल्यास, तुमचे तुमच्या शेजाऱ्यांमध्ये अधिक चांगले सामाजिक स्थान होईल."

71 विश्वासाने आपली दृष्टी वर लावा आणि ज्याने म्हटले आहे त्याच्याकडे पाहा की, "हे शरीर अपवित्र करा, आणि मी त्याचा नाश करीन." विश्वासाने आम्ही या गोष्टींवर विश्वास ठेवतो. हे असे काही नाही जे आपण पाहिलेले आहे. हे असे काही आहे ज्यावर तुमचा विश्वास आहे. विश्वासाने, मोशेने केले.

72 आणि ह्या विश्वासाच्या मार्गात, अशी एक वेळ येते जेथे निवड करावी लागते.

73 लोटाने ती घोड चूक केली जी आपण करतो. पुष्कळ वेळा आपण आपल्या फायद्यासाठी निवड करतो. आपण गोष्टी निवडतो ज्या अधिक चांगल्या असतील.

74 कधीकधी मंडळीमध्ये किरकोळ भांडण होते, आणि कोणी म्हणेल, "बरं, डिकन किंवा पाळक या बाजूला आहेत." त्याकडे पाहू नका. जे नितीमत्व आहे त्याकडे पहा. ती गोष्ट बाहेर काढा आणि त्या दोघांना एकत्र आणा. ती सुभक्ती आहे.

75 तेथे एक निवड आहे. आणि आपण स्वतःसाठी निवडतो. आपण आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी काहीतरी निवडतो.

76 परंतु मोशेने पीडा व अपमान निवडले, यासाठी की त्याला देवाच्या लोकांबरोबर चालता यावे. आता याचा विचार करा. ते लक्षपूर्वक ऐका. “देवाच्या लोकांबरोबर दु:ख निवडले, आणि ती मोठी संपत्ती आहे असे गणले. कारण जो अदृश्य होता, त्याला पाहत असल्यासारखा त्याने धीर धरला.”

आता, एकदा, लोटालाही निवड करावी लागली.

77 आणि असे असू शकते, की आज सकाळी, येथे पुरुष आणि स्त्रिया असतील, जे आपली अंतिम निवड करतील. आपण आज आहात जे आपण आहात, कारण बर्याच वर्षांपूर्वी आपण आता जे आहात त्याची आपण निवड केली होती. आणि आपण आता काय निवडता हे ठरवेल की आपण आजपासून पाच वर्षांनंतर काय असाल. आजपासून पाच वर्षांनंतर आपण एक मिशनरी होऊ शकता. आजपासून पाच वर्षांनंतर आपण एक प्रख्यात ख्रिस्ती असू शकता.

78 किंवा, आजपासून पाच वर्षांनंतर आपण नरकात असू शकता, कारण आपण चुकीचा निर्णय घेतला. आजपासून पाच वर्षांनंतर आपण एका बाथरूममध्ये पिकदाणी साफ करीत असाल. आजपासून पाच वर्षांनंतर आपण रस्त्यावर वेश्या असू शकता.

79 किंवा, आपण एखादा पुरुष किंवा एक स्त्री असू शकता जे—जे तुम्ही ख्रिस्तासाठी केलेल्या तुमच्या निवडीमुळे, तुम्ही कोणत्याही समाजासाठी सन्माननीय असाल. आजपासून पाच वर्षांनंतर आपण गौरवामध्ये असू शकता, स्वर्गरोहणामध्ये गेलेले असू शकता, कारण आपण आज आपली निवड केली आहे.

80 परंतु तुम्हाला निवड करावी लागेल. आणि तुम्हाला जे दिसत आहे त्याकडे पाहू नका. विश्वासाने आपण जे पहात आहात त्याची निवड करा. केवळ तीच गोष्ट गृहीत धरली जाईल, जी तुम्ही विश्वासाने निवडता.

81 लोट, त्याला निवड करावी लागली. अब्राहामाने लोटाला त्याची निवड दिली.

82 आणि देव आपल्याला आपली निवड देतो. “आजच तुम्ही निवड करा की तुम्ही कोणाची सेवा करणार.” एदेन बागेत तेथे एक ज्ञानाचे—चे झाड होते, आणि एक जीवनाचे झाड होते. मनुष्याला त्यापैकी त्याच्या इच्छेनुसार एक निवडण्याचा विशेषाधिकार देण्यात आला होता. आणि आजही तसेच आहे. एक स्वतंत्र इच्छा असणारा म्हणून, तुम्हाला तुमचा विशेषाधिकार देण्यात आला आहे, की तुमच्या इच्छेप्रमाणे निवड करावी.

83 माझा तुम्हाला असा सल्ला आहे की, तुमच्या सभोवतालच्या आधुनिक गोष्टींकडे पाहू नका, आणि लोकप्रियता आणि अत्यंत आकर्षक सौंदर्य जे तुम्हाला मिळू शकते. परंतु, त्याऐवजी, विश्वासाने, त्याला निवडा, ज्याने वचन दिले आहे की एक दिवस तो येईल आणि सर्व चुकीचे सुधारील, आणि तुम्हाला अनंतकाळचे जीवन देईल, आणि तुम्हाला उठविल. काही फरक पडत नाही जर आपण प्रभुच्या काही लोकांसमवेत तिरस्कृत ठरलेला मार्ग स्वीकारता, ती निवड करा. जर तेथे तुमच्या समोर समस्या असतील, जर देशात समस्या असतील, जर मंडळीत समस्या असतील, जर घरात समस्या असतील, त्या कुठेही असल्या तरी काही फरक पडत नाही, आपली निवड करा, “विश्वासाने, मी देवाची सेवा करीन. मी त्याच्या उपस्थितीत माझे हृदय नम्र करीन. मी देवाच्या लेकरांबरोबर पुढे जाईन. मी त्यांना तिरस्कारयुक्त आणि नाकारलेले पाहतो, आणि त्यांना काढून टाकलेले आणि त्यांची चेष्टा केलेले पाहतो, पण तरीही मी माझ्या

कर्तव्यपदावर राहीन. मी त्यांच्या बरोबर राहीन. आणि जेव्हा ते रडतात, मी त्यांच्याबरोबर रडेन. आणि जेव्हा तेथे दु:ख असेल, तेव्हा मी त्यांच्याबरोबर दु:ख करेन. ते ज्या प्रकारे जगतात, मी जगेन."

84 जसे नामी म्हणाली…किंवा, रूथ नामीला म्हणाली, "तुझे मार्ग माझे मार्ग असतील. माझे मार्ग तुझे मार्ग असतील. तू जेथे राहशील, तेथे मी राहीन. तु जेथे जाशील, तेथे मी जाईन. तु ज्या देवाची सेवा करशील तो माझा देव होईल." जरी आपण विचार करीत असाल आपण कोणीतरी आहात, तुमच्या सदसद्विवेकबुद्धीची कुचंबणा होत असली, तरी ती निवड करा. स्वत:ला बाजूला करा आणि प्रभुच्या तुच्छ लोकांबरोबर तुमचा मार्ग घ्या, आणि सेवेच्या क्षेत्रात आणि कर्तव्याच्या पदावर निष्ठावान रहा.

85 लोटाने आजूबाजूला पाहिले. तो म्हणाला, "मला एक निवड मिळाली." आणि त्याने सदोमाकडे पाहिले. जे अब्राहामानी पाहिले होते त्यापेक्षा त्याने चांगले गवताळ शेत पाहिले आणि तेथे अब्राहाम राहत होता. त्याने आपल्या गुराढोरांना चारण्यासाठी, जाडजूड आणि चांगली गुरेढोरे मिळवण्याच्या संधी पाहिल्या.

86 मी आशा करतो की मी कोणाच्याही भावना दुखवत नाही. परंतु बर्याच प्रचारकांची अशी भूमिका असते, सुवार्तेसह तडजोड करण्यासाठी, जे असा विचार करतात की त्याद्वारे त्यांना अधिक पैसे मिळतात. [भाऊ ब्रॅन्हमने तीन वेळा टाळ्या वाजवल्या—सम्पा.] एक भोजनाचे तिकिट! त्याऐवजी मी नापीक देशात राहीन, ओढ्यामधून पिईन, आणि सोडा बिस्किटे खाईन, जिवंत देवाच्या वचनावरील माझ्या विश्वासाच्या दृढतेवर तडजोड करण्यापेक्षा. मी माझा मार्ग घेईन.

87 त्यांच्यातील काहीजण म्हणाले, "बिली, तूझ्या सभांमध्ये काय समस्या आहे, कारण तेथे बरेच पेन्टेकोस्टल आहेत." असे एक मोठा संप्रदायाचा सेवक म्हणाला.

मी म्हणालो, "तुमचा संप्रदाय माझ्या सभेला प्रायोजित करेल का?"

88 फार काळ झाला नाही, *लूक* मासिकामध्ये, मला वाटते, तेथे एक लेख आला होता. आणि तेथे लेखक म्हणाला, पेन्टेकोस्टल लोकांबद्दल बोलला. तो म्हणाला, "पेन्टेकोस्टल मंडळी ही आज जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी मंडळी आहे." का? ह्याचे कारण हे आहे की पुरुष आणि स्त्रियांनी त्यांची दृष्टी वर लावली आहे आणि ते दूरचे पाहत आहेत.

89 आणि लेखकाने पेन्टेकोस्टल लोकांचे देखील कौतुक केले. होय, अर्थातच, ते म्हणाले, "तेथे त्यांच्यातील काहीजण होते जे अत्यंत पुरोगामी बनले, आणि वगैरे. पण, मेथडिस्ट एका पंथाची उपासना करतात. ते पंथाद्वारे देवाची उपासना करतात. बाप्टिस्ट आणि प्रेस्बिटेरियन्स हेच करतात. पण पेन्टेकोस्टल त्याच्या बायबलद्वारे उपासना करतो."

90 विश्वासाने आपण अभिवचन पाहतो. मी माझे सर्वस्व त्यांच्याबरोबर घेईन, त्यांचा कितीही तिरस्कार केला गेला तरी हरकत नाही, तरीही मी त्यांच्या पैकी एक आहे. जरी त्यांची खिल्ली उडविली जात असली, आणि त्यांच्या जीवनात चढ आणि उतार असले, जसे इस्त्राएलने केले, मला कधीही बलामासारख्या, टेकडीवर असलेल्या खोट्या संदेष्ट्याबरोबर उभे राहायचे नाही, आणि ज्यांना देवाने आशीर्वादित केले आहे त्यांना शाप देण्याचा प्रयत्न करायचा नाही. कारण, त्या छावणी मध्ये प्रहार केलेला खडक, आणि एक रक्तरंजित यज्ञ, आणि एक अग्निस्तंभ आहे. ते आतून कसे आहेत ह्याची पर्वा नाही, ते त्यांना विजयाकडे घेऊन जात आहे, आणि त्यांना त्याकडे यावे लागेल, कारण ते अभिवचन दिलेले लोक आहेत जे विश्वासाने चालत आहेत. जरी ते संप्रदाय नसले, तरी ते

इकडेतिकडे भटकणारे होते, आणि तसेच देवाचे लोक आहेत. परंतु मी त्यांच्याबरोबर माझा मार्ग घेऊ इच्छितो, त्यांच्याबरोबर त्यांच्यात सामील होऊ इच्छितो; त्यांच्या संप्रदायामध्ये नव्हे, परंतु देवाच्या शाश्वत आत्म्याच्या लेखांच्या सहवासात, जो, विश्वासाने मला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला आहे. देवा मला सदैव तशी वृत्ती बाळगण्यास मदत करो.

91 लक्ष द्या. जसे ते पुढे जात गेले, आपल्याला आढळते की लोटाने एका—एका गुरांच्या वसाहतीची संधी पाहिली. अनेकजण चांगले पैसे मिळण्याची संधी पाहतात. बरेच लोक चांगल्या सामाजिक स्थितीची संधी पाहतात. त्याने काही अतिरिक्त डॉलर्सची शक्यता पाहिली. त्याने शहराचा महापौर होण्याची शक्यता पाहिली. तो एक नवखा असल्याने, आणि एक चतुर हुशार मनुष्य असल्याने, जसा तो होता, "कदाचित मी शहराचा प्रमुख पुरुष होईन." त्याने शक्यता पाहिल्या कारण त्या त्याच्यापुढे ठेवल्या होत्या. परंतु त्याने तो अग्नी पाहिला नाही जो त्या भूमीचा नाश करणार होता. त्याने स्वत:शी समेट केला नाही, ती भूमी तर पापाने भरली होती, आणि देवाला तिचा नाश करायचा होता.

92 आणि, आज, "तुम्ही आहात…?" असे सांगून लोक स्वत:शी समेट करण्याचा प्रयत्न करतात.

मी म्हणेन, "तुम्ही ख्रिस्ती आहात का?"

93 ते म्हणतात, "मी एक अमेरिकी आहे." तो एक बेडूक होता असे कावळ्याला सांगण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा त्याचा ह्याच्याशी काही एक संबंध नाही. त्याचा ह्याच्याशी काही संबंध नाही. [भाऊ ब्रॅन्हम एकदा टाळ्या वाजवतात—सम्पा.]

94 तिचा नाश होणार आहे, कारण देव न्यायी आहे. आणि जर अमेरिकेला तिच्या पापांची क्षमा मिळाली, तर नीतिमान व सार्वभौम, पवित्र देव सदोम व गमोराचे—चे पुनरुत्थान करण्यास कर्तव्य-बद्ध असेल आणि त्यांच्या पापामुळे; त्यांचा नाश केला म्हणून माफी मागण्यास, जर त्याने आम्हाला त्यासह जाऊ दिले तर.

95 जर तो आपल्याला आपल्या अन्यायी कृत्यांसह स्वर्गात जाऊ देतो, तर त्याला हनन्या आणि सप्पीरा ह्यास उठवावे लागेल आणि त्यांना आणखी एक संधी द्यावी लागेल. तो नक्कीच करेल. पण तो न्यायी आहे. हनन्याने आपले पैसे पाहिले. पेत्राने ख्रिस्ताला पाहिले.

96 अरे देवा! त्या ठिकाणी लोटाला आपल्या मुलांचा नाश दिसला नाही.

97 आज, तुमच्यापैकी बरेच जण, या जुन्या औपचारिक पंथ आणि अशा गोष्टीं पकडून आहेत, आपण बाल अपराध आणि आपल्या मुलांचा नाश पाहत नसतो. आपण वेश्या घरात आपल्या मुलीला पाहत नाहीत. आपण आपल्या मुलाला मद्यपी, किंवा कुठेतरी पत्त्यांच्या टेबलवर पाहत नाही.

98 "कारण तिला उत्तम प्रकारे वाढविण्यात आलेले आहे." आणि पापाला स्पर्शही केलेला नाही. जेव्हा तो पाहत होता, तेव्हा त्याने आपल्या पत्नीला, जी सर्व समाजमंडळाची प्रमुख, तिला मीठाचा खांब होताना पाहिले नाही. त्याने त्याला, त्याच्या आयुष्यासाठी, दाताच्या काठाने, कुठेतरी एका लहानशा शहरात, पळून जाताना पाहिले नाही. त्याने ते पाहिले नाही, कारण त्याने केवळ त्याकडे पाहिले जे त्याला त्याच्या समोर दिसत होते.

99 परंतु, अब्राहाम, त्याने चांगल्या पाण्याच्या भूमिकडे लक्ष दिले नाही, कारण त्याने आपले डोळे वर लावले, आणि भावी काळ पाहिला, कारण त्याला सर्व गोष्टी वारसाहक्काने

मिळणार होत्या. खरा ख्रिस्ती आज आपले डोळे वर करुन ख्रिस्ताचे अभिवचन पाहतो: "जे नम्र ते धन्य, कारण त्यांना सर्व काही मिळेल. त्यांना पृथ्वीचे वतन मिळेल." खरा ख्रिस्ती, विश्वासाने, वर पाहतो आणि ते पाहतो. आपल्याला पाहिजे ती नावे त्याला ठेवा. त्याने आपली दृष्टी वर लावली आहे. आणि जेव्हा त्याने हे केले, तेव्हा देव म्हणाला, "अब्राहामा, तू भूमीतून चालत जा, ती सर्व तुझी आहे." विश्वासानेच, अब्राहामाने हे केले; तोच विश्वास मोशेकडे होता.

100 हे एका भाष्यकर्त्याने लिहिले होते, ते असे म्हणाले. मला वाटले की हे सर्वात सुंदर शब्द आहेत. तो अब्रा–..."मोशेने जगातील सर्वोत्कृष्ट वस्तू घेतल्या आणि त्यास एका पारड्यात ठेवले; आणि जे धर्माविरुद्ध होते, आणि ते दुसऱ्या पारड्यात ठेवले; आणि जे धर्मा विरुद्ध होते त्याचे पारडे जगातील सर्वोत्कृष्ट गोष्टीं पेक्षा अधिक ठरले."

101 आजही असेच आहे की, आपल्याला काही संबोधले तर आपल्याला "धर्मवेडे," म्हटलेले आवडेल, किंवा "दिव्य रोग बरे करणारे," किंवा "देववेडे लोक," किंवा जे काही ते संबोधू इच्छितात. सर्वात वाईट जे आम्ही आहोत ते जगातील सर्वात चांगले आहेत त्यांच्यापेक्षा अधिक मोलाचे होऊ. आम्हाला कोणी "जुन्या फॅशनचे, जुने गोंधळलेले, धर्मांध," बोलावे अशी इच्छा नाही. सैतानाने तुम्हाला देऊ केलेल्या सर्वोत्कृष्ट गोष्टीपेक्षा ते अधिक मोलवान असेल. हे नक्कीच होईल.

102 मोशेने ख्रिस्ताच्या विटंबनेचा आदर केला. त्याने आगाऊ ख्रिस्ताला पाहिले. नंतर तो त्याच्याविषयी काही प्रभावी प्रेरणादायक शब्द बोलला. "पाहा, प्रभू देव तुमच्यासाठी माझ्यासारख्या संदेष्ट्याला उभा करील." त्याला माहित होते. त्याने त्याला आगाऊ पाहिले, आणि त्याने जगाच्या सर्व आकर्षक सौंदर्यापेक्षा त्याच्या विटंबनेचा अधिक आदर केला.

103 ख्रिस्ती मित्रांनो, आज, आपण हे करू शकत नाही का? आणि विश्वासाने, जगाचे सर्व आकर्षक सौंदर्य आणि लोकप्रियता, आम्ही त्याला पाहतो ज्याने वचन दिले आहे. आणि मंडळीची, तिच्या सर्व परिस्थितीमध्ये, आज सर्वात वाईट परिस्थिती आहे, तरीही ती सैतान आपल्याला देऊ शकत असलेल्या प्रत्येक गोष्टीपेक्षा अधिक ठरेल. जर आपण फाडले गेलो आहोत, जर आपण तुटलेले आहोत, जर आपण गोंधळात पडलेलो आहोत आणि तुटलेलो आहोत, संप्रदायात आणि धर्मांधतेत आहोत, हे सैतान आपल्याला देऊ शकत असलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा उजवे ठरेल. नक्कीच.

104 ख्रिस्ता प्रीत्यर्थ विटंबना सोसणे ही मिसर देशातील धनसंचयापेक्षा अधिक मोठी संपत्ती आहे असे त्याने गणिले. मग त्याला काहीतरी करावे लागले. त्याने मिसर सोडले. अरे, मला तो शब्द आवडतो. त्याने मिसर सोडले. पाहा, तो त्याच खिडकीतून पाहत होता, परंतु त्याचे पाहणे फारोपेक्षा भिन्न होते. फारोला आपला अंत दिसला असता तर काय झाले असते? जर फारोने आपले राष्ट्र बुडलेले पाहिले असते तर काय झाले असते? मोशेने ते पाहिले. कसे? विज्ञानाने? विश्वासाने, मोशेने ते पाहिले. सर्व काही त्याने विश्वासाने केले, कारण देवाने अब्राहामाला, त्याच्या पित्याला, अभिवचन दिले होते, की तो—तो चारशे वर्षांनंतर या राष्ट्राला भेट देईल, आणि त्यांना तेथून बाहेर आणील. आणि विश्वासाने, मोशेने देवाने सांगितलेल्या वचनावर विश्वास ठेवला, आणि विश्वासाने, त्याने स्वत:ला जाणले, की तो त्यांना बाहेर आणण्यासाठी निवडलेला नेता व्हावा. तो कोठे होता हे त्याला ठाऊक होते. त्याने त्याची जागा चिखलाच्या खड्ड्यांमध्ये, चिखल मळणारा म्हणून घेतली. आणि मिसराच्या गादीवर बसण्यापेक्षा ख्रिस्तासाठी विटंबना सोसणे ही फार मोठी संपत्ती आहे असे गणले. त्याने घेतले...तो कधीच म्हणाला नाही, "मला त्याविषयी

सहानुभूती आहे." त्याने त्यांची जागा घेतली आणि त्यांच्या बरोबर गेला! त्यास गौरव... त्याने त्यांचे स्थान घेतले. आम्ही त्यांच्याबरोबर गेलो.

105 हयात आश्चर्य नाही तो प्रेरित लेखक म्हणाला:

> मी परमेश्वराच्या काही तुच्छ लोकांसह मार्ग घेईन.
> मी येशूबरोबर सुरुवात केली आहे, आता मी जात आहे.
> मी कनानाच्या भूमीकडे जात आहे. (निश्चित.)

106 मोशे. असे एकाने म्हटले होते की मोशेने त्याऐवजी, जेव्हा तो फारोचा मुलगा होऊ शकला असता आणि जगाची चमक त्याला मिळू शकली असती, तो फारोचा पुत्र होण्याऐवजी अब्राहामाचा पुत्र झाला. एक अब्राहामाचा पुत्र, तुच्छ लेखलेला, फारोचा पुत्र, एक राजा होण्यापेक्षा.

107 मी त्याऐवजी प्रभु येशूचा पुत्र आणि त्याचा सहकारी होईन, आणि या जगाच्या नाकारलेल्या लोकांसह माझे स्थान घेईन, या महान अमेरिकेचा अध्यक्ष होण्यापेक्षा, किंवा एल्विस प्रेस्ली, किंवा पॅट बून, किंवा जे कोणी आपण बनु इच्छित आहात. मी माझा मार्ग घेईन

108 तरुण स्त्रियांनी त्यांचा मार्ग घेतला पाहिजे. एक—एक मेरी पिकफोर्ड, किंवा कोणी उत्कृष्ट चित्रपट तारिका होण्याऐवजी, कोणी आकर्षक मुलगी होण्याऐवजी, परमेश्वराच्या तिरस्कारयुक्त काही लोकांबरोबर तुमचा मार्ग निवडा.

109 मी त्याऐवजी वेदीवरील प्रचारक होईन, ख्रिस्ताच्या अतुलनीय संपत्तीचा प्रचार करणारा होईन, हॉलिवूड चित्रपट तारा, किंवा पृथ्वीवरील महान व्यक्ती होण्यापेक्षा. जरी मला अल्प खावे लागले, विनंती करावी लागली, किंवा मला जे काही करावे लागेल, तरी मी माझा मार्ग परमेश्वराच्या लोकांसमवेत घेईन. विश्वासाने, मी ते करतो. मला संधी देण्यात आल्या आहेत. पण, देवाच्या कृपेने, मी अजूनही विश्वासाने पाहतो.

> विश्वासाने मी ते दुरूनच पाहू शकतो;
> आणि आमचा पिता मार्गात थांबतो,
> तेथे आपल्याला निवासस्थान तयार करण्यासाठी.

110 दुसर्या दिवशी, एक आयकर मनुष्य म्हणाला, "तू आपले घर त्या प्रार्थनामंदिरात का रूपांतरित केले? तु पंचवीस हजार डॉलर्सचे घर त्या जुन्या कचर्यासारख्या दिसणाऱ्या प्रार्थना मंदिराकरिता का दिले?"

111 मी म्हणालो, "हे ते चर्च नव्हते जे मी बनविले. हे तेथील लोक आहेत." माझ्याकडे या जगाचा कोणताही माल नाही. मी घेतलेला प्रत्येक पैसा मी या चर्चकरिता वापरला आहे. का? माझा विश्वास देवावर आहे, आणि या जगाच्या गोष्टींवर नाही. माझे प्रेम वरील गोष्टीवर आहे. आणि माझा विश्वास आहे की आपण जर देवाशी योग्य असाल, तर आपण सर्व तसेच आहात. हे खरे आहे, की आपण आहात. आपण, विश्वासाने, प्राप्त करतो. आपण, विश्वासाने, देवावर विश्वास ठेवतो.

112 मोशे, त्याला एक निवड करावी लागली. आणि मग त्याला, निवड केल्यानंतर, त्याला विश्वासाशी झुंज द्यावी लागली, तेव्हा, कारण राजाच्या क्रोधाची त्याला भीती वाटत नव्हती. आता, मानवीरित्या, त्याला क्रोधाची भीती बाळगण्याचा अधिकार होता. राजाच्या रागाची भीती बाळगण्याचा त्याला अधिकार होता, परंतु त्याने तसे केले नाही. त्याने ते केले नाही, कारण त्याच्याकडे करण्यासाठी एक काम होते, आणि तो कर्तव्यपदाच्या

मार्गावर होता. आणि राजा त्याबद्दल काय बोलला याची त्यांने पर्वा केली नाही. त्याने आपला मार्ग अगदी तसाच घेतला.

113 आता, फारो, अर्थात, जेव्हा त्याने पाहिले त्याचा पराभव झाला आहे, तेव्हा त्याची मोशे व मुलांना देण्याची इच्छा होती…तो म्हणाला, "ठीक आहे, मी काय करणार आहे ते मी तुम्हाला सांगेन. तुम्ही सर्वजण देशातच राहा व तेथे जा आणि आपल्या देवाला यज्ञ करा."

114 सैतान अशाच तऱ्हेने कार्य करतो. "अरे, आपण धार्मिक होऊ शकता. आपण का जात नाही आणि एखादया मंडळी मध्ये सामील होत नाही? आपल्याला या सर्व गोष्टी करण्याची गरज नाही." एक मनुष्य आपल्या पत्नीस म्हणतो…

115 बायको म्हणते, "पती, माझे तारण झाले आहे. यापुढे हात आणि नखे रंगविणार नाही, किंवा ओठांना लाली लावणार नाही आणि तशा गोष्टी करणार नाही. असे आणखी पुढे नाही. आणखी मेजवाण्या नकोत. या समाजातील आणखी गोष्टी नकोत. मी यातून बाहेर पडले आहे! मी घराची काळजी घेताना, वचन वाचण्यात माझा वेळ देईन."

116 "आता, प्रियांनो, पहा. आपण, आपण धार्मिक असू शकता, ठीक आहे. आता, पहा, आपण—आपण *येथे* जाता. आपल्याला चुकीची मंडळी मिळाली."

117 नाही, आपल्याला मिळू शकत नाही. तूम्ही योग्य मंडळीत आहात. जर एखादा प्रचारक आपणास मिळाला असेल जो तुम्हास हा उपदेश करील, तर तुम्ही त्याबरोबर राहिले पाहिजे. शास्त्रवचनांमधून शोधा आणि ते बरोबर आहे की नाही ते पहा.

118 "अरे," म्हणाले, "*इथे* जा. ते करत नाहीत—ते करत नाहीत त्यांना येथे हे करण्याची गरज नाही. पहा? ते येथे असे करत नाहीत." तो मार्ग आहे…"फक्त इतके दूर जा." परंतु आपण या देशातून बाहेर पडावे अशी त्याची इच्छा नाही. सैतान असेच करत असतो. आपण जगाच्या गोष्टींमधून बाहेर पडावे अशी त्याची इच्छा नाही; फक्त जग मंडळीत आणा.

119 दुसर्या दिवशी, रस्त्यावरून खाली उतरताना, मी माझा रेडिओ चालू केला. आणि तेथे एक—एक गाणे होते, आणि मी ऐकतच राहिलो, आणि ते खरोखरच धार्मिक गाणे होते की नव्हते हे सांगण्यापूर्वी, मला जवळजवळ, पूर्ण गाणे ऐकून घ्यावे लागले, किंवा सैतान देवाच्या गोष्टी जगाच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण ते करू शकत नाही! देवा दया करो!

120 सर्व चांगल्या धार्मिक गाण्यांचे, एल्विस प्रेस्ले किती अल्बम लिहितात याची मला पर्वा नाही. अजूनही त्याच्यावर सैतानाचे वर्चस्व आहे. आणि मला माहित असलेल्या सर्व हालचाली, आजच्या ह्या संपूर्ण जगात, त्याने अधिक मुलांना नरकात पाठविले आहे. पॅट बून आणि बाकीचे, ते द चर्च ऑफ क्राइस्टचे होते; आणि एल्विस प्रेस्ली, एक पेन्टेकोस्टल्स; त्या माणसांच्या रूपात, ते यहूदा इस्करियोत आहेत. सैतान देवाच्या उच्च गोष्टी आणण्याचा प्रयत्न करीत आहे, जेणेकरून ते त्यांना *येथे* खाली मिसळवू शकतील. लोक *या* वर पाहणार नाहीत. ते फक्त *येथे* पाहतात, म्हणतात, "ठीक आहे, सर्व काही सारखेच आहे." ते सारखे नाही. त्या भूमीतून बाहेर पडा.

121 म्हणाला, "तुम्ही फक्त काही दिवस जाऊ शकता. आणि तुम्ही जा, तिथे राहा." नक्कीच, त्याला माहित होते की ते परत येतील. मग त्याला असे आढळले की त्याने काम होणार नाही, म्हणून त्याने काहीतरी वेगळा बेत केला. तो म्हणाला, "तुम्ही काय करावे हे मी तुम्हाला सांगेन. तुम्हाला जेथे जायचे तेथे जा, पण तुम्ही तुमच्या बायका, तुमची

सर्व मुले, व तुमची सर्व गुरेढोरे, *येथे* सोडून जा. तुम्ही त्यांना इथं सोडा, आणि तुम्ही बाहेर जा." कारण, त्याला माहित होते की तेथे त्यांची मालमत्ता आहे, यामुळे ते परत खेचले जातील.

122 आणि हेच सैतान तुम्हाला सांगतो. जोपर्यंत तुम्ही जगाच्या काही गोष्टी आपल्यावर टांगत ठेवता, तोपर्यंत आपण अद्याप धूम्रपान करू इच्छिता, आपल्याला मद्यपान करावेसे वाटते, तुम्ही जगासारखा पोशाख करू इच्छिता, तेच तर सैतानाला हवे आहे.

123 मी पतनाविषयी बरेच काही ऐकतो. माझा विश्वास नाही की तेथे इतके पतन होत आहे जितका लोक विचार करीत आहेत की तेथे आहे. त्यांना परत येण्यास प्रवृत्त करण्यासाठी त्यांनी मिसरामध्ये मध्ये बरीच संपत्ती सोडली आहे, एवढेच. पतन हे तसे नाही जे ते म्हणतात तसे आहे. तुम्ही जगाच्या बऱ्याचशा गोष्टी मागे ठेवल्या आहेत, ज्या तुम्हाला आकर्षित करतात.

124 भाऊ, मी तुम्हाला सांगतो, जेव्हा मध्यरात्री, इस्राएल तयार झाले, त्यांच्याकडे या जगात जे काही आहे ते सर्व होते, बांधाबांध केलेले आणि जाण्यासाठी तयार असलेले.

125 देव आम्हाला त्यासारखे पुनरुज्जीवन पाठवतो. आम्ही सर्व काही सामानाची बांधाबांध करतो, आणि जाण्यासाठी सज्ज होतो. मध्यरात्रीची हाक येत आहे की, "त्याला सामोऱ्या चला." आपल्याकडे सर्व काही बांधलेले आहे. आपल्याकडे काही नसणे हे चांगले आहे, हे जग, तुम्हाला परत आकर्षित करणारे आहे, कोणत्याही तारा तुम्हाला खाली धरुन ठेवणाऱ्या आहेत. सामान बांधा. आपण तयार होऊया. आपण जात आहोत.

126 आणि आपल्याला माहित आहे काय? मी तुम्हांस सांगतो, मध्यरात्री फारो फार उत्साही होईपर्यंत, ते देवाशी इतके खरे होते, तो म्हणाला, "चला! बाहेर पडा, आणि जात रहा. तुमच्या कडे जे सर्व काही आहे ते घ्या, आणि जा!"

127 मला इतका आनंद होत आहे की मनुष्य देवाशी इतका जवळ राहू शकतो, की तोपर्यंत सैतानाला त्याच्याबरोबर काय करावे हे कळत नाही. ते बरोबर आहे. बाहेर जा! जात रहा! देवाची आज्ञा पाळा!

128 विश्वासाने, त्याने अभिवचन पाहिले. चिखल मळणारा, किंवा चिखल मळणारा नव्हे, त्याने परमेश्वराच्या तुच्छ लेखलेल्या लोकांबरोबर त्याचा मार्ग घेतला. फारोने म्हटले, "आपल्याकडे जे काही आहे ते घ्या आणि येथून निघून जा! तुझ्याबरोबर काय करावे हे मला माहित नाही." विश्वासाद्वारे, तो देवाशी इतका खरा होता.

129 जर आपण देवाशी खरे राहिलो, तर विश्वास चमत्काराची कृत्ये करील. विश्वासाने, आम्ही त्याला पाहतो.

आपला वेळ संपला आहे; निघून गेला आहे.

130 परंतु, विश्वासाने, आज सकाळी, तुमची दृष्टी वर करा. आपल्या सभोवताली काय आहे हे पाहू नका, हे आधुनिक जग, परंतु त्याला पाहा आणि त्याच्याकडे पहा ज्याने अभिवचन दिले आहे. बायबलमध्ये म्हटले आहे की, "आपण आता सर्व काही पूर्णपणे पाहत नाही, परंतु आपण येशूला पाहतो." आज सकाळी, तुम्ही त्याच्याकडे पाहा, आणि तुमचे मार्ग बदलले जातील.

131 आपण, काही क्षणासाठी, प्रार्थनेच्या शब्दासाठी आपली मस्तके झुकवूया. प्रभू ह्या संदेशावर त्याचा आशीर्वाद देवो.

132 आता तुमच्या अंत:करणात विचार करा. काय आपण जगाच्या गोष्टींकडे पहात आहात? विश्वासाने, आपण येशूला पाहता का? काय आपण आपली लोकप्रियता,

आपल्या चर्चकडे पहात आहात? जगाबरोबर आपले सामाजिक स्थान काय आहे? किंवा, आपण येशूला पाहतो ज्याने, दयेने, स्वत:ला उर्ध्वलोकि राजवैभवाच्या उजवीकडे ठेवले आहे, ज्याने एक हुतात्मा म्हणून दु:ख भोगले, एका नीतीमानाने अनीतीमानाकरिता? आपण दृष्टी वर करुन पलीकडे जीवनाचा वृक्ष पाहू शकत नाही का? मग, विज्ञान आणि ज्ञानाचे हे झाड सोडून द्या, आणि त्याची सेवा करा.

133 मी प्रार्थना करण्यापूर्वी आपली आठवण प्रार्थनेत केल्यास आवडेल काय? आपल्याला गरज असलेल्या कोणत्याही विनंतीसाठी, आपले हात वर करा. देव तुम्हाला आशीर्वाद देवो. तो तुम्हा सर्वांचे हात पाहतो.

134 जर आपण एक पापी आहात, तर आता आपले डोळे वर करा आणि वर पहा. जर आपण उदासीन आहात, जर तुमचे काही किरकोळ गोष्टींवरून भांडण झाले असेल आणि छोट्या गोष्टी असल्यास, तर त्याने काय फरक पडणार आहे? आपण या दिवसांपैकी एके दिवशी मरणार आहात. कोणत्या दिवशी? कदाचित आज! आपल्याला माहित नाही. आतापासून एक तासानंतर, आपण नरकात असाल, किंवा आपण स्वर्गात असाल. परंतु तुम्हाला आताच निवड करावी लागेल. जर आपल्या जीवनात असे काही आहे जे बरोबर नाही, तर तुम्ही आताच, विश्वासाने निवड करा.

135 आपण म्हणाल, “ठीक आहे, जर मी तिच्याबरोबर सलोखा करू शकलो तर! मी जर त्याच्याबरोबर सलोखा करू शकले तर!” त्यांनी काय केले याच्याशी काही कर्तव्य नाही, जीवन निवडा. जीवन निवडा.

136 कारण, येशूने म्हटले, “जर तुम्ही लोकांना त्यांच्या अपराधांची तुमच्या मनापासून क्षमा केली नाही, तर तुमचा स्वर्गीय पिताही तुमच्या अपराधांची क्षमा करणार नाही.” तर तशाप्रकारे समजून घ्या. जर एखादा व्यक्ती, पापी किंवा संत यांच्या विरुद्ध आपल्या अंत:करणात काही असल्यास, तुम्हाला नरकातील अग्नीचा धोका आहे.

137 आता तुमची दृष्टी वर करा. तुम्ही काय पाहता, तुमचा शत्रू? किंवा, तुम्ही आपला तारणारा पाहता? आज सकाळी आपण काय पहात आहात?

138 जर तुम्ही आजारी आहात आणि तुमचे डॉक्टर असे सांगतात की तुम्ही बरे होऊ शकत नाही, तुमची दृष्टी वर लावा, वधस्तंभाकडे, जेथे त्याला आपल्या अपराधांमुळे जखमी करण्यात आले, त्याला बसलेल्या फटकयांनी आपल्याला आरोग्य प्राप्त झाले. डॉक्टर काय म्हणतात त्याकडे पाहू नका; तो विज्ञानामध्ये कार्य करीत आहे. विश्वास आत्म्याच्या आणि देवाच्या आय्यामामध्ये कार्य करतो. आपण हात वर केले असता या गोष्टींचा विचार करूया. देवाने त्यांना पाहिले आहे.

आपण प्रार्थना करूया.

139 हे अनंत देवा, आता या उपासनेच्या शांततेत, हा संदेश पुढे गेल्यानंतर, प्रभू, तुझ्या वचनाचे बीज, खडकाळी भूमीवर पडू देऊ नकोस. प्रभु, हा संदेश, कुसळे, काटयांमध्ये, पडू देऊ नकोस, जेणेकरून या संसाराची चिंता (लोटा प्रमाणे) त्यास गुदमरून बाहेर काढील, शेवटी, तो एक बहिष्कृत व्यक्ति होईल. परंतू, हे धन्यवादीत देवा, ते चांगल्या, सुपीक जमिनीवर, पश्चाताप करणाऱ्या अंतःकरणावर पडू दे. आणि माझ्यावर, देखील, प्रभू, की आपण सर्व जण देवाच्या चष्म्यातून पाहू शकू, आणि प्रभु येशूची नाकारलेली मंडळी, नाकारलेले लोक पाहू शकू, नाकारलेला मार्ग, आणि आपण या वैभवी मार्गाने चालू शकू.

140 जसे मोशेला, तो कुठे जात आहे हे त्याला ठाऊक नव्हते. त्या लोकांना माहित नव्हते की ते कोठे जात होते. कोणत्या मार्गाने जायचे हे त्यांना माहित नव्हते. त्यांनी केवळ सुरुवात केली.

141 आणि, हे प्रभू परमेश्वरा, जसं हे सुंदर स्तोत्र वाजवले जात आहे, विश्वासाने आपण ती भूमी खूप दुरून पाहू शकतो. हे आताच होऊ दे, की येथील पुरुष आणि स्त्रिया जग काय म्हणत आहे, किंवा ते कसे चालत आहेत याचा विचार करणार नाहीत. ते केवळ त्यांच्या आत्म्यामध्ये उठविले जाऊ दे, आणि जाऊ दे.

142 मोशेने त्या प्रकाशाचे अनुसरण केले, आणि त्याने त्याला वचनदत्त देशात नेले. तो कोठे जात आहे हे ठाऊक नव्हते, परंतु तो फक्त प्रकाशामध्ये चालत गेला, त्या भूमीकडे जी दिवसापेक्षा सुंदर होती.

143 प्रभु, आज, प्रदान कर, की येथे बरेच लोक पवित्र शास्त्राच्या प्रकाशात आणि पवित्र आत्म्याच्या सहवासात व मंडळीबरोबर चालतील; मंडळी, प्रथम जन्मलेले, ख्रिस्त प्राप्त झालेली नवजात बाळके, आणि पवित्र आत्म्याने भरलेले, आत्म्याद्वारे चालणारे. आपण एकत्रितपणे, देवाच्या नियमाच्या सहभागीतेत चालावे, त्याचा मृत्यू, दफन आणि पुनरुत्थान यांच्या आज्ञाधारकतेमध्ये, बाप्तिस्म्याने त्याची सेवा करावी. आपण त्याच्या आदेशानुसार त्याची सेवा करावी, “जोपर्यंत तुम्हाला वरुन सामर्थ्य प्राप्त होत नाही तोपर्यंत तुम्ही यरुशलेमेत वाट पहा.” आपण आजारी लोकांसाठी प्रार्थना करीत, दैवी आरोग्यात त्याची सेवा करावी. आपण त्याची प्रभू भोज, भाकरी मोडणे, हृदयाच्या एकाग्रतेने, देवाच्या वचनाभोवती सहभागीता करून सेवा करावी. ती भूमी दिसेपर्यंत आपण त्याच्या सर्व दिव्य लेखांमध्ये त्याची सेवा करू या. प्रभु, हे प्रदान कर. आम्ही आता हे सर्व तुला समर्पित करीत असता, प्रभु येशूच्या नावाने, आमची प्रार्थना ऐक.

144 आता आपली मस्तके झुकविली असता, शांतपणे, हळूवारपणे, आपण हे गाणे गाऊया. आता ही आराधना आहे. संदेश संपला आहे. कोणीही जाऊ नका. फक्त शांत रहा. आपण आराधना करूया.

145 हा संदेश सुधारणूकीचा आहे. आपण काय केले, आपण काय करायला हवे होते, आणि आपण आज जे आहात ते कशामुळे आहात यावर आता विचार करा. आज, तुम्हाला अपराधीपण का वाटत आहे, ह्याचे कारण तुम्ही काल काहीतरी केले आहे. उद्या ते कसे होईल? आजच ते ठीक करा, आणि आपण उद्या मोकळे व्हाल. पहा? तुम्ही निवड केली पाहिजे. तुम्ही ते कसे करू शकता? “विश्वासाने, मी आता सर्वकाही मोकळे होऊ देतो. मी आता मोकळे होऊ देतो, आणि कोणत्या एके दिवशी मी तेथे जाणार आहे.”

> त्या मधुरस्थळी, अनंतात
> त्या सुंदर तीरी आपण भेटू–…

आता आपल्या आत्म्याने फक्त परमेश्वराची उपासना करा.

> त्या मधुरस्थळी, अनंतात
> आपण त्या तुच्छ लेखल्या गेलेल्या मंडळीला भेटू. (कठीण जात आहे, परंतु आम्ही एके दिवशी भेटू.)
>
> आमच्या वरील उदार पित्याला,
> आपण आपल्या स्तुतीची श्रद्धांजली अर्पण करू,
> त्याच्या प्रेमाच्या वैभवशाली भेटीसाठी,
> आणि ते आशीर्वाद जे आम्हास पवित्र करतात…

विश्वासाने, देवाच्या काही तिरस्करणीय लोकांसमवेत, मी निवड करतो.

त्या मधुरस्थळी (त्या मधुरस्थळी) अनंतात...(अनंतात)
त्या सुंदर तीरी आपण भेटू; (अनंतात)
त्या मधुरस्थळी (त्या मधुरस्थळी) अनंतात,
त्या सुंदर तीरी आपण भेटू.

तेथे एक भूमी आहे...

फक्त त्याची आराधना करा. तीच आराधना आहे.

...विश्वासाने मी पाहू शकतो,

विश्वासाने मी माझी निवड करतो.

होय, पिता वाट पहात आहे...

146 मी तेथे प्रभूच्या सर्वांना पहात आहे; भाऊ जॉर्ज, भाऊ सेवर्ड, सर्व संतजन.

...आम्हासाठी तेथे राहण्याची जागा आहे. (होय, प्रभू!)
त्या मधुर...

147 तिचे वडील, हॉवर्ड, एडवर्ड, बऱ्याच समया पूर्वी, सर्व वयस्क संत मित्र, ज्यांनी पलीकडचा मार्ग घेतला आहे.

त्या मधुरस्थळी (होय, प्रभु!) अनंतात (अनंतात),
त्या सुंदर तीरी आपण भेटू.

आपण गाऊ त्या सुंदर –...(हे देवा!)
शुभेच्छा देणारी मधुर गाणी, (परमेश्वराची स्तुती होवो!)
...यापुढे दु:ख असणार नाही,
त्या विश्रांतीच्या ठिकाणी मिळणाऱ्या आशीर्वादासाठी उसासा नाही.

त्या मधुरस्थळी, मधुरस्थळी...(अनंतात)
त्या सुंदर तीरी आपण भेटू–...

***विश्वासाने, मोशेने*** MAR58-0720M

(By Faith, Moses)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवार सकाळी, 20 जुलै, 1958, ब्रॅन्हम टॅबर्नकल जेफर्सनव्हीले, इंडियाना, यू.एस.ए., येथे प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेरेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2021 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE

19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM

CHENNAI 600 034, INDIA

044 28274560 • 044 28251791

india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS

P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.

www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.



VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org